राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाच्या Core Group इतर संबंधित विभागाचा समावेश करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र.कौविका-२०११/(१९७/११)/व्यशि-५
दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०११.

पहा : १. मा. मुख्य सचिव यांचे पत्र क्र. Cso-2011/227/d.1, दि. ५/१०/२०११
२. शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(३/२०१०)/व्यशि-५, दिनांक १९ मे, २०१०.
३. शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(१४२/२०१०)/व्यशि-५, दिनांक ९ मे, २०११.
४. दि. २१/१०/२०११ रोजी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांबाबतच्या Core Group च्या बैठकीचे इतिवृत्त

## शासन परिपत्रक

मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. सदरहू कौशल्य विकास परिषदेने ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत तसेच राज्यस्तसवर ४.५ कोटी एवढे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

कौशल्य विकास कार्यक्रमांबाबतच्या Core Group मध्ये नगर विकास विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग, सामाजिक व न्याय विभाग, ग्राम विकास विभाग व उद्योग विभाग या विभागांच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांना या कोअर ग्रुपचे समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. कौशल्य विकास कार्यक्रमाची व्याप्ती व महत्व लक्षात घेता राज्याच्या महत्वाच्या KRA मध्ये या कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

राज्याने निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित इतर विभागाचा देखील कौशल्य विकास कार्यक्रमांबाबतच्या Core Group मध्ये समावेश करण्यात येत आहे. त्यानुसार कौशल्य विकास कार्यक्रमाच्या कार्यकारी समितीत असलेल्या कामगार विभाग, शालेय शिक्षण विभाग,

आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला बाल व कल्याण विकास विभाग आणि सहकार व वस्त्रोद्योग विभाग या विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचा राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमांबाबतच्या Core Group मध्ये समावेश करण्यात येत आहे.

हे शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. २०१११११०९१७०९५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(गौ.जो.रसाळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
निवड नस्ती/व्यशि-५